# उद्याचा प्रवास सुखकर

## मेट्रो -३च्या कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांचा विश्वास

**म. टा. विशेष प्रतिनिधी,** मुंबई

उपनगरी रेल्वेने सध्या ७५ लाख प्रवासी प्रवास करत असून रेल्वेवरचा ताण दिवसेंदिवस वाढत आहे. भविष्यात मेट्रो प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर तब्बल ९० लाख प्रवाशांना मेट्रोसेवेचा लाभ मिळून मुंबईकरांचा प्रवास सुखकर होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी येथे व्यक्त केला.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ प्रकल्पाच्या भूमिगत मार्गाचा बोगदा खणण्यासाठी अजस्त्र यंत्रे आयात करण्यात आली आहेत. ही यंत्रे एका खोल आणि विशाल विहिरीत सोडली जाणार आहेत. त्यानंतर प्रत्यक्ष खोदकामाला सुरूवात होईल. माहीम, नयानगर येथील प्रकल्पस्थळी हे यंत्र मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विहिरीत सोडण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. मेट्रोच्या अन्य प्रकल्पांपैकी काही प्रकल्पांच्या निविदा काढण्यात आल्या आहेत, काही प्रकल्पांच्या निविदा लवकरच निघणार आहे, काही प्रकल्पांची कामे सुरू आहेत, असे सांगून भूमिपूजन झालेला प्रत्येक प्रकल्प हा वेगाने पूर्ण केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

मेट्रो प्रकल्पांसोबतच रेल्वेचा एलिव्हेटेड कॉरिडोर उभारण्याबाबत रेल्वेशी चर्चा सुरू आहे, तसेच स्थानक परिसर विकासाच्या दिशेनेही काम सुरू आहे, असे त्यांनी सांगितले. भविष्यात बस, ट्रेन, मेट्रो, जलवाहतूक या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी एकच तिकिटप्रणाली असेल. त्यामुळे प्रवाशांना विभिन्न वाहतूक सेवेचा लाभ घेताना एकसारखे तिकीट काढावे लागणार नाही. त्यासाठी एका कंपनीशी सामंजस्य करार करण्यात आला असून त्यासंदर्भातील अॅप विकसित केले जात आहे, अशी माहितीही त्यांनी दिली.

शैलेश जाधव



### पाणी तुंबले तरी...

मेट्रोचे काही प्रकल्प भूमिगत, तर काही प्रकल्प एलिव्हेटेड आहेत. त्यामुळे अतिवृष्टीमुळे कदाचित पाणी तुंबले तरी मेट्रोसेवेवर परिणाम होणार नाही आणि प्रवाशांचा प्रवास विनाखंडित पार पडेल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

### मुख्यमंत्री उवाच..

मुंबईचा खडक तसेच समुद्र यामुळे मेट्रोसारखी कामे आव्हानात्मक असतात. दिल्ली आणि कोलकात्याच्या तुलनेत मुंबईत काम करणे खूप कठीण मेट्रो-३साठी वापरण्यात आलेले तंत्रज्ञान पाहता हा इंजिनीअरिंगच्या क्षेत्रात नवा अध्याय लिहिला गेला आहे.

### निर्णय आमच्या बाजूने

मेट्रो संदर्भात विविध न्यायालयांनी आमच्या बाजूने निर्णय दिले असून मेट्रो प्रकल्प हे मुंबईच्या हिताचे आहेत. दोन कोटी वृक्ष लावल्यानंतर जेवढे कार्बन उत्सर्जन कमी होईल, तेवढे काम एका मेट्रोमुळे होईल.